MGT

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत तंटामुक्त गावांना पुरस्कार देण्यासाठी कमी पडणारा रु.५६,३०,००,०००/- इतका निधी मंजूर करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
### गृह विभाग
शासन निर्णय क्र.तंमुगा १०१०/११०६/प्र.क्र.९५/२०१०/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: १० जानेवारी, २०११.

वाचा:- १) अवर सचिव, गृह विभाग, बीयुडी-१ यांचे पत्रक्रमांक- एसयूपी १११०/ प्र.क्र.२५१/२०/बीयुडी-१, दिनांक- ३१/१२/२०१०.

शासन निर्णय :- सन २००९-१० या मोहीमेच्या तृतीय वर्षातील तंटामुक्त गाव पुरस्कार प्राप्त गावांना पुरस्कार प्रदान करणे, ग्रामपंचायतींना लेखनसामग्री खरेदी करण्यासाठी अनुदान उपलब्ध करणे तसेच वृत्तपत्र बातमीदारांना पुरस्कार प्रदान करणे इत्यादी प्रयोजनासाठी मूळ अर्थसंकल्पात तंटामुक्त गाव मोहिम (२०५५ ०५ ३३) ३१ सहायक अनुदाने (दत्तमत) या लेखाशीर्षाखाली रु. ५०.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. तथापि, सदरहू तरतूद पुरस्कार पात्र गावांची संख्या लक्षात घेता अपूरी पडत असल्याने या प्रयोजनार्थ कमी पडणारी रुपये ५६,३०,००,०००/- (रुपये छपन्न कोटी तीस लाख फक्त) रकमेची पूरक मागणी विधानमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती.

सन २०१०-११ या वर्षाकरीता पूरक अनुदान महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१० (सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४, दिनांक १० डिसेंबर, २०१० मध्ये प्रसिद्ध करण्यात आले असल्याचे संदर्भाधिन पत्राने कळविले आहे. सबब, पुरवणी मागणीद्वारे मंजूर तरतूद रुपये ५६,३०,००,०००/- (रुपये छपन्न कोटी तीस लाख फक्त) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सपूर्द करण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च गृह विभाग मागणी कमांक : बी - १, प्रधान लेखाशीर्ष - २०५५ पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००)(२०) तंटामुक्त गाव मोहिम (२०५५ ०५ ३३) ३१ सहायक अनुदाने (दत्तमत) या शीर्षाखालील मंजूर तरतूद तसेच सन २०१० च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी बाब क्र- १८ अन्वये मंजूर झालेल्या निधीतून भागविण्यात यावा.

३. सन २००९-१० या तृतीय वर्षातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्काराची घोषणा करण्यात आल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त गावांना अनुज्ञेय ठरणाऱ्या पुरस्काराच्या रकमेइतक्या तरतूदींचे जिल्हानिहाय वितरण पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे करतील.

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा:-
आवक नं. DC
5000
- 3 FEB 2011
विशेष नोंद वही नं.:- 14 03/02/11
कार्य विवरण नं.:-
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

५. जिल्हा पोलीस अधीक्षक हे संबंधित जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त गावांच्या पुरस्काराच्या रकमेचे धनादेश तयार करतील आणि गावनिहाय त्याचे वितरण करतील.

६. सदर प्रयोजनार्थ काढावयाची देयके ही महाराष्ट्र कोषागार नियम नमुना क्रमांक ४४ मध्ये सादर करून यासाठी लागणारी रक्कम आहरित करावी.

७. सदरचे आदेश संदर्भ क्रमांक (१) येथील कार्यासन बीयुडी-१ च्या दिनांक ३१/१२/२०१० च्या पत्राच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि. फ. वसावे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
महालेखापाल-१ (ले व अ/लेखापरिक्षा) महाराष्ट्र,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग (व्यय-७/ अर्थ-१०) मंत्रालय,मुंबई,
निवडनस्ती, पोल-१५.